स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा- ॥ अंतर्गत, विविध उपांगाच्या अंमलबजावणीसाठी, तांत्रिक, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी यंत्रणा (निविदा प्रक्रियेसह) यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः स्वभामि २०२१/प्र.क्र.२७२ (भाग-१)/पापु-१६**

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय इमारत संकुल,

मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.

**तारीख: १८ ऑक्टोबर,२०२१.**

वाचा:-

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :-स्वभामि-२०२०/ प्र. क्र.११६ / पापु- १६, दिनांक २८/१०/२०२०.

२) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :- झेडपीए-२०१५/प्र. क्र.१०/ वित्त-९, दिनांक २५ मार्च, २०१५

३) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :- झेडपीए-२०१६/प्र. क्र. ५६/ वित्त-९, दिनांक ०७/१०/२०१७ व दिनांक ०१/०३/२०१८.

४) ग्राम विकास विभाग. शासन निर्णय क्रमांक :- निविदा-२०२१/प्र. क्र.७८/ बांधकाम-४. दिनांक २७ मे. २०२१

प्रस्तावना -

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-॥ अंतर्गत, सार्वजनिक शौचालय बांधकाम, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन. गोबरधन, मैला गाळ व्यवस्थापन व प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन या उपांगाचा समावेश आहे. संदर्भाधीन क्रमांक २ येथील ग्राम विकास विभागाच्या दिनांक २५/०३/२०१५ च्या शासन निर्णयानुसार विकास कामाबाबत, विना ई-निविदेची वित्तिय मर्यादा रू. ३ लक्ष एवढी निर्धारीत करण्यात आली होती. संदर्भाधीन क्रमांक ४ येथील ग्राम विकास विभागाच्या दिनांक २७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार, सदरची वित्तिय मर्यादा रू. १० लक्ष पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन

क्रमांक ३ येथील शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०१७ व शासन शुद्धीपत्रक, दिनांक ०१/०३/२०१८ अन्वये, तांत्रिक व प्रशासकीय मान्यताबाबतचे अधिकार, ग्राम विकास विभागाने प्रदान केले आहेत. त्यास अनुसरून, उपरोक्त उपागांच्या अंमलबजावणीसाठी, तांत्रिक, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी यंत्रणा (निविदा प्रक्रियेसह) याबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

उपरोक्त उपागांच्या अंमलबजावणीसाठी, तांत्रिक, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी यंत्रणा (निविदा प्रक्रियेसह) या अनुषंगाने, ग्राम विकास विभागाने निर्गमित केलेल्या सूचना अनुरूप, पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत:-

**अ) ग्रामसभेची मान्यता असलेल्या, गावस्तरीय उपांगाच्या बाबतीत, स्वच्छ भारत अभियन (ग्रा) टप्पा -II च्या निधीतून अनुज्ञेय खर्च ७०% व त्या अनुषंगाने १५ वा वित्त आयोग निधीतून अनुज्ञेय खर्च ३०% अशा प्रकारे एकत्रित किंमत विचारात घेवून, {मनरेगा हिस्सा वगळून, मनरेगा करिता प्रचलित पध्दतीनुसार कार्यवाही} या एकत्रित अनुज्ञेयतेच्या अनुषंगाने ,खालील तक्त्यामध्ये नमूद अधिकाऱ्यांनी/ यंत्रणांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी -:**

| क्र. | उपांग किंमत | तांत्रिक मान्यता अधिकार | प्रशासकीय मान्यता अधिकार | अंमलबजावणी यंत्रणा (निविदा प्रक्रियेसह) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | रू. ५.० लक्ष पर्यंत. | संबधित, उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग | संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती | रकाना क्रमांक ३ व ४ प्रमाणे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर, "अंमलबजावणी यंत्रणा" म्हणून ग्रामपंचायत यांनी, विहित कार्यपद्धती अनुसरून ( विना ई-निविदा ), निश्चित केलेल्या कार्यान्वयन यंत्रणेला (Contractor) कामाचे कार्यारंभ आदेश द्यावेत. |

| क्र. | उपांग किंमत | तांत्रिक मान्यता अधिकार | प्रशासकीय मान्यता अधिकार | अंमलबजावणी यंत्रणा (निविदा प्रक्रियेसह) |
|---|---|---|---|---|
| २. | रूपये ५.० लक्ष पेक्षा जास्त | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद . | अ) रकाना क्रमांक ३ व ४ प्रमाणे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर, रूपये ५ लक्ष पेक्षा जास्त व रूपये १० लक्ष पर्यंतच्या किंमतीच्या कामाच्या बाबतीत, "अंमलबजावणी यंत्रणा" म्हणून ग्रामपंचायत यांनी, विहित कार्यपद्धती अनुसरून, (विना ई-निविदा), निश्चित केलेल्या कार्यान्वयन यंत्रणेला (Contractor) कामाचे कार्यारंभ आदेश द्यावेत. |
| | | | | ब) रकाना क्रमांक ३ व ४ प्रमाणे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर, संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णय दिनांक २५/०३/२०१५ मधील तरतुदीस अनुसरून, सक्षम असणा-या ग्रामपंचायतीने, रूपये १० लक्ष पेक्षा जास्त व रूपये १५ लक्ष पर्यंतच्या किंमतीच्या कामाच्या बाबतीत, "अंमलबजावणी यंत्रणा" म्हणून ई-निविदा कार्यपद्धती अनुसरून, निश्चित केलेल्या कार्यान्वयन यंत्रणेला (Contractor) कामाचे कार्यारंभ आदेश द्यावेत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | तथापि ज्या ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न रू. ५०,०००/- पेक्षा जास्त नाही, (संदर्भाधीन क्रमांक २. अ.क्र. १ ) अशा प्रकरणी, रू. १० लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या कामाच्या बाबतीत, **"अंमलबजावणी यंत्रणा"** म्हणून कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांनी ई-निविदा कार्यपद्धती अनुसरून, निश्चित केलेल्या कार्यान्वयन यंत्रणेला (Contractor) कामाचे कार्यारंभ आदेश द्यावेत.<br>क) रू. १५ लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या कामाच्या बाबतीत, "अंमलबजावणी यंत्रणा" म्हणून कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांनी ई-निविदा कार्यपद्धती अनुसरून, निश्चित केलेल्या कार्यान्वयन यंत्रणेला (Contractor) कामाचे कार्यारंभ आदेश द्यावेत. |

ब) जिल्हापरिषदेची मान्यता असलेल्या, तालुका/जिल्हास्तरीय उपांगाच्या बाबतीत, खालील तक्त्यामध्ये नमूद अधिका-यांनी/यंत्रणांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी :-

| क्र. | उपांग किंमत | तांत्रिक मान्यता अधिकार | प्रशासकीय मान्यता अधिकार | अंमलबजावणी यंत्रणा (निविदा प्रक्रियेसह) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| <u>तालुका/जिल्हा स्तरीय- प्लास्टिक कचरा व्यवस्थापन</u> | | | | |
| १. | रूपये ५.० लक्ष पर्यंत. | उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा | संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती | रकाना क्रमांक ३ व ४ प्रमाणे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर, **"अंमलबजावणी यंत्रणा"** म्हणून उप अभियंता, जि. प., ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, यांनी, विहित कार्यपद्धती |

| क्र. | उपांग किंमत | तांत्रिक मान्यता अधिकार | प्रशासकीय मान्यता अधिकार | अंमलबजावणी यंत्रणा (निविदा प्रक्रियेसह) |
|---|---|---|---|---|
| | | उपविभाग, (मुख्यालय) | | अनुसरून (विना ई-निविदा), निश्चित केलेल्या कार्यान्वयन यंत्रणेला (Contractor) कामाचे कार्यारंभ आदेश द्यावेत. |
| २. | रूपये ५.० लक्ष पेक्षा जास्त | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि. परिषद | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. | रकाना क्रमांक ३ व ४ प्रमाणे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर, **"अंमलबजावणी यंत्रणा"** म्हणून कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. यांनी, रूपये ५ लक्ष पेक्षा जास्त व रूपये १० लक्ष पर्यंतच्या किंमतीच्या कामाच्या बाबतीत, विहित कार्यपद्धती अनुसरून (विना ई-निविदा) व रू.१० लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या कामाच्या बाबतीत, ई-निविदा कार्यपद्धती अनुसरून, निश्चित केलेल्या कार्यान्वयन यंत्रणेला (Contractor) कामाचे कार्यारंभ आदेश द्यावेत. |
| जिल्हास्तरीय -गोबरधन | | | | |
| १. | रूपये ५.० लक्ष पर्यंत. | उप अभियंता, जि. प., ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग, (मुख्यालय) | गट विकास अधिकारी, पंचायत समिती (तालुका-मुख्यालय) | तालुका / जिल्हा स्तरीय- प्लास्टिक कचरा व्यवस्थापन मधील अनुक्रमांक १ स्तंभ क्र. ५ नुसार |

| क्र. | उपांग किंमत | तांत्रिक मान्यता अधिकार | प्रशासकीय मान्यता अधिकार | अंमलबजावणी यंत्रणा (निविदा प्रक्रियेसह) |
|---|---|---|---|---|
| २. | रूपये ५.० लक्ष पेक्षा जास्त (स्व.भा.मि. (ग्रा) टप्पा-II अनुज्ञेयतेतील प्रकल्प ) | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद . | तालुका/जिल्हा स्तरीय- प्लास्टिक कचरा व्यवस्थापन मधील अनुक्रमांक २ स्तंभ क्र. ५ नुसार |
| | राज्यस्तरीय पथदर्शी गोबरधन प्रकल्प | मुख्य अभियंता, म. जी. प्रा. प्रादेशिक विभाग. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. | रकाना क्रमांक ३ व ४ प्रमाणे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर, मा.मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय गोबरधन समितीची तत्वत: मान्यतेकरिता प्रस्ताव शासनास सादर करावा. सदर प्रस्तावास समितीची मान्यता व केंद्र शासनाची निधी नियोजनाबाबतची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, ई-निविदा कार्यपद्धती अनुसरून,"**अंमलबजावणी यंत्रणा"** म्हणून कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि. प. यांनी संबधित कार्यान्वयन यंत्रणेला (Contractor) कामाचे कार्यारंभ आदेश द्यावेत. |
| **जिल्हास्तरीय-मैला गाळ व्यवस्थापन (मैला गाळ व्यवस्थापनाच्या उपांगाकरिता, स्व.भा.मि. (ग्रा) टप्पा-II किंमतीतून, मनरेगा हिस्सा वगळून)** | | | | |
| १. | रूपये ५.० लक्ष पर्यंत. | उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी | संबधित गट विकास | तालुका/जिल्हा स्तरीय- प्लास्टिक कचरा व्यवस्थापन मधील अनुक्रमांक १ स्तंभ क्र. ५ नुसार |

| क्र. | उपांग किंमत | तांत्रिक मान्यता अधिकार | प्रशासकीय मान्यता अधिकार | अंमलबजावणी यंत्रणा (निविदा प्रक्रियेसह) |
|---|---|---|---|---|
| | | पुरवठा उपविभाग, (मुख्यालय). | अधिकारी, पंचायत समिती | |
| २. | रूपये ५.० लक्ष पेक्षा जास्त | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | तालुका/जिल्हा स्तरीय- प्लास्टिक कचरा व्यवस्थापन मधील अनुक्रमांक २ स्तंभ क्र. ५ नुसार |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०२११०१४१११७२४२१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267228122b638d6f2cdedad62, pseudonym=268C7E15F99BF8B492638E14751A661EBCF0233F, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2021.10.18 11:20:17 +05'30'

( चं. कृ. मोरे )

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
३. सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालयीन विभाग, मुंबई.

७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.

९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी

१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

११. सहसचिव (स्वभामि), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.

१३. प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर, नवी मुंबई.

१४. उपायुक्त (विकास), सर्व.

१५. उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच यांना द्याव्यात.

१६. कार्यकारी अभियंता/उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग/उप विभाग सर्व

१७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१८. संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.

१९. कार्यासन ( पापु-१६ ), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. ( निवडनस्ती ).

राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीची
पुनर्रचना करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०२१/प्र.क्र.२९३/पापु-१६
७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल, मंत्रालय,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१
दिनांक: २१ ऑक्टोबर, २०२१

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः संस्वअ १०१९/प्र.क्र.३३९/पापु १६, दिनांक १९ डिसेंबर, २०११.

२) शासन निर्णय क्रमांकः स्वभामि २०२०/प्र.क्र.१७७/पापु १६, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१.

प्रस्तावना -

उपरोक्त वाचा क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये तत्कालीन संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या प्रकल्प आराखड्याच्या मान्यतेसाठी राज्यस्तरीय योजना मान्यता समिती गठीत करण्यात आलेली आहे. केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा -२ राज्यात राबविण्याबाबत मा.मंत्रीमंडळाने दिनांक २८/०७/२०२१ रोजी मान्यता दिल्यानुसार, उपरोक्त वाचा क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ च्या अंमलबजावणी बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ करिता राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत राज्याचा वार्षिक कृती आराखडा (AIP) आणि योजना कृती आराखडा (PIP) यांच्या मान्यतेसाठी राज्यस्तरीय योजना मंजूरी समिती (SLSSC) पुढीलप्रमाणे पुनर्गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता. | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. मंत्रालय | उपाध्यक्ष |
| ३. | सहसचिव/उप सचिव तथा अभियान संचालक, स्वभाअ (ग्रा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. मंत्रालय | सदस्य |
| ४. | राज्य प्रकल्प संचालक, सर्व शिक्षा अभियान. | सदस्य |
| ५. | उपसचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय. | सदस्य |
| ६. | उपसचिव, नियोजन विभाग (राष्ट्रीय रोजगार हमी योजना), मंत्रालय. | सदस्य |
| ७. | प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर. | सचिव |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११०२११११३६१३४६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=11ac20921 9edb36f7777ee1101657bea427109026... 22b638d5f2cdedad62, pseudonym=268C7E15F998F8B492638E14751A661EBCF0233F, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA3982F617A... 3182B577B7C9A858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2021.10.21 17:35:04 +05'30'

चं.कृ.मोरे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.

३) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

४) विधानसभा व विधानपरिषद सदस्य.

५) मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.

६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.

७) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

८) जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.

९) सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी

१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

११) सहसचिव तथा अभियान संचालक, स्वभाअ (ग्रा.), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई

१२) राज्य प्रकल्प संचालक, सर्व शिक्षा अभियान.

१३) उपसचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय.

१४) उपसचिव, नियोजन विभाग (राष्ट्रीय रोजगार हमी योजना), मंत्रालय.

१५) प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर.

१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.

१७) उपायुक्त (विकास), सर्व.

१८) संचालक, मीत्रा -नाशिक /संचालक,नीरी-नागपूर/संचालक,उन्नत महाराष्ट्र अभियान, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय

१९) उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व.

२०) उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग सर्व.

२१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

२२) कक्ष अधिकारी ,संगणक , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेलद्वारेही पाठवावा.

२३) निवडनस्ती,पापु-१६.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत गावे हागणदारी मुक्त अधिक (ODF Plus) म्हणून जाहीर करण्यासाठी व पडताळणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक :- स्वभामि २०२१/प्र.क्र.१६४/पापु १६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २९ ऑक्टोबर, २०२१.

वाचा

१. केंद्र शासन पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय यांच्या माहे, जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सुचना
२. केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाचे पत्र दिनांक ०९ जून,२०१५.
३. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक:-स्वभामि-२०१५/ प्र.क्र.१८१/पापु-८, दिनांक २७ ऑक्टोबर २०१५.
४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक:- स्वभामि-२०१९/ प्र.क्र.१९० / पापु-१६, दिनांक १८ जुलै २०१९
५. केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय यांचे पत्र दिनांक ३० जून, २०२०.
६. शासन परिपत्रक क्रमांक :- स्वभामि २०२१/प्र.क्र.१६४/पापु १६, दिनांक १५ मार्च, २०२१
७. शासन पत्र क्रमांक :- स्वभामि-२०२१/प्र.क्र.१६४/पापु-१६ दिनांक ३० जून, २०२१.
८. केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय यांचे पत्र दिनांक ०३ सप्टेंबर, २०२१.
९. केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय यांचे पत्र दिनांक १० सप्टेंबर, २०२१.

प्रस्तावना:-

संदर्भाधीन क्र.२ येथील संयुक्त सचिव, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण), पेयजल व स्वच्छता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दिनांक ९ जून २०१५ च्या पत्रामध्ये, हागणदारीमुक्त ग्रामपंचायतीची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे. त्यास अनुसरून, संदर्भाधीन क्रमांक ३ येथील, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये, हागणदारीमुक्त झालेल्या ग्रामपंचायती स्वयंघोषित करणे आणि त्यांची पडताळणी करणे या अनुषंगाने व संदर्भाधीन क्रमांक ४ येथील, दिनांक १८ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये, हागणदारीमुक्त झालेल्या ग्रामपंचायतींच्या दुस-या टप्प्यातील पडताळणीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

संयुक्त सचिव, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण), पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय, नवी दिल्ली, यांनी संदर्भाधीन क्रमांक ५ येथील दिनांक ३० जून, २०२० च्या पत्रान्वये, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत गावे हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) म्हणून

जाहीर करण्यासाठी व पडताळणी करण्याबाबत कार्यपद्धती विषद केली. त्यास अनुसरून, वाचा क्र.६ येथील शासन परिपत्रकान्वये व वाचा क्र.७ येथील शासन पत्रान्वये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत गावे हागणदारी मुक्त अधिक (ODF Plus) म्हणून जाहीर करण्यासाठी व पडताळणी करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

आता वाचा क्र.८ येथील पत्रान्वये केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत गावे हागणदारी मुक्त अधिक (ODF Plus) म्हणून जाहीर करण्यासाठी व पडताळणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचनामध्ये सुधारणा केली आहे. तसेच वाचा क्र.९ येथील पत्रान्वये केंद्र शासनाने हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) गावे IMIS वर नोंद घेऊन घोषित करण्यासाठी मोडयूल उपलब्ध करुन दिले आहे. त्यानुसार स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत गावे हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) म्हणून जाहीर करण्यासाठी व पडताळणी करण्याबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत गावे **हागणदारी मुक्त अधिक (ODF Plus) म्हणून** जाहीर करण्यासाठी व पडताळणी करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. संदर्भाधीन क्रमांक ३ येथील, दिनांक २७ ऑक्टोबर २०१५ च्या शासन निर्णयान्वये, सद्यस्थितीत ग्रामीण भागात नव्याने निर्माण झालेल्या (ज्या यापूर्वी संबधित जिल्ह्यातील ग्रामीण भागात गाव किंवा वस्ती स्वरुपात अस्तित्त्वात नव्हत्या) व ज्या ग्राम पंचायतींची हागणदारीमुक्त बाबतची घोषणा आणि पडताळणी यापूर्वी झाली नव्हती अशा सर्व ग्रामपंचायतींची हागणदारीमुक्त बाबतची घोषणा व पडताळणी करण्यात यावी.

२. सद्यस्थितीत राज्य व जिल्हास्तरावर मुख्य संसाधन संस्था अस्तित्त्वात नसल्याने, या पडताळणीसाठी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समिती गठीत करून अथवा आंतर तालुका पडताळणीच्या माध्यमातून गावाची पडताळणी करावी व त्याप्रमाणे गावांच्या नोंदी केंद्र शासनाच्या SBM-MIS वर उपरोक्त दिनांक २७ ऑक्टोबर २०१५ च्या शासन निर्णया मधील निर्देशानुसार करावयात.

३. शासन निर्णय, दिनांक २७ ऑक्टोबर २०१५ नुसार, पहिल्या टप्प्यातील पडताळणी झाल्यानंतर, संदर्भाधीन क्रमांक ४ येथील, दिनांक १८ जुलै २०१९ च्या शासन निर्णयातील, सूचनांनुसार,हागणदारीमुक्त झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छतेचे सातत्य असल्याबाबतची खात्री करण्यासाठी, दुस-या टप्प्यातील, हागणदारीमुक्त ग्रामपंचायतींची पडताळणी करावी व त्याप्रमाणे ग्रामपंचायतींच्या नोंदी केंद्र शासनाच्या SBM-MIS वर करावयात.

४. या शासन निर्णयाप्रमाणे वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्तरावरील स्वच्छतेची कामे पूर्ण करून जिल्ह्यास हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) मानांकनाचा दर्जा प्रदान करणेकरिता,

वर्षनिहाय नियोजन करून, खालील निकषांची पूर्तता करून, जिल्ह्याने त्यांच्या क्षेत्रातील क्रमाक्रमाने सर्व गावे तथा संपूर्ण जिल्हा सन २०२४-२५ पर्यन्त <u>हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)</u> म्हणून घोषित करावा.

<u>हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) व्याख्या:-</u>

**"हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) म्हणजे ग्रामीण भागातील गावांसाठी हागणदारी मुक्ततेचे मानांकन प्राप्त गावांमध्ये, शौचालयाचे बांधकाम/ पुर्नप्रस्थापिकरण, सामुदायिक शौचालय संकुल, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन व इतर अनुषंगिक कामे पूर्ण करून स्वच्छता शाश्वतरित्या कायम ठेवणे."**

**अ) <u>गावे/जिल्हा हागणदारी मुक्त अधिक (ODF+) करण्याबाबत निकष खालील प्रमाणे:-</u>**

**i) हागणदारी मुक्त शाश्वतता**

- गावातील शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी शौचालय सुविधा असावी.
- गावात आवश्यकतेप्रमाणे सार्वजनिक शौचालय सुविधा/ फिरत्या/ स्थलांतरित लोकसंख्येसाठी सार्वजनिक शौचालय सुविधा असावी.
- हागणदारीमुक्त शाश्वतता, शौचालयांचा योग्य वापर, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छतेच्या सवयी आणि शाश्वत स्वच्छता इ. अनुषंगाने माहिती, शिक्षण व संवादाचे ( IEC) किमान ५ संदेश गावात दृष्यांकीत केलेले असावेत.

**ii) घनकचरा व्यवस्थापन-**

- सर्व सार्वजनिक ठिकाणी ( प्राथमिक शाळा, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय ) तथा किमान ८० टक्के कुटुंबांकडे प्रभावीरीत्या घनकचरा व्यवस्थापन असणे आवश्यक आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत, जनावरे व शेतातून निर्माण होणारा विघटनशील कचरा इत्यादींसाठी वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावरील कंपोस्ट पीट, प्लॅस्टिक कचरा यांचे वर्गीकृत करणारी व कचरा संकलन करणारी पुरेशी यंत्रणा असावी व त्याअनुषंगाने योग्य ते व्यवस्थापन केलेले असावे.

<u>हागणदारीमुक्त अधिक म्हणून गावे जाहीर करताना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात.</u>

१. गावातील सर्व संस्थीय इमारतींना जसे शाळा/अंगणवाडी/ग्रामपंचायत कार्यालय यांना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सुविधा उपलब्ध आहेत.
२. गावात अविघटनशील कच-याच्या प्रक्रियेसाठी सामूहिक खत खडडे आहेत.
३. गावात कचरा एकत्रिकरण आणि वाहतुकीसाठी कचरा वाहतूक गाडीची सुविधा आहे.
४. गावामध्ये कचरा एकत्रिकरण आणि विलगीकरणासाठी शेड उपलब्ध आहे.
५. जर वरील सुविधा गावामध्ये नसतील आणि अन्य मार्गाने घनकचरा व्यवस्थापन केले असेल तर खालील प्रमाणपत्र SBM-MIS वर PM ०५ मधून upload करावे.

प्रमाणपत्राचा नमूना (धनकचरा व्यवस्थापन)

मी_________________सरपंच/उपसरपंच/प्रधान___________ ग्राम पंचायत___________तालूका________जिल्हा_____________राज्य आणि मी ____________ ग्राम सेवक प्रमाणित करतो/करते की, आमच्या गावात (गावाचे नाव) वैयक्तिक/सार्वजनिक स्तरावर घनकच-याचे एकत्रिकरण, वाहतूक आणि त्यावर प्रक्रिया करण्यासाठी पुरेशी व्यवस्था आहे. सदर ठराव हा दिनांक ________च्या ग्राम सभेमध्ये घेण्यात आला आहे.

iii) **सांडपाणी व्यवस्थापन-**

- सर्व सार्वजनिक ठिकाणी ( प्राथमिक शाळा, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय ) तथा किमान ८० टक्के कुटुंबांकडे प्रभावीरीत्या सांडपाणी व्यवस्थापन असणे आवश्यक आहे. वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावरील शोष खड्डे, नाल्यांची कामे हाती घेऊन, सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत स्वयंपाक गृहातील आणि अंघोळीचे सांडपाणी/ पावसाचे वाहून जाणारे पाणी/ सेप्टिक टँक मधून प्रवाहीत होणारे Black water इ. चे व्यवस्थापन केलेले असावे.

हागणदारीमुक्त अधिक म्हणून गावे जाहीर करताना सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात.

१. गावातील सर्व संस्थीय इमारतींना जसे शाळा/अंगणवाडी/ग्रामपंचायत कार्यालय यांना सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत सुविधा उपलब्ध आहेत.

२. गावामध्ये सार्वजनिक स्तरावरील शोष खडडे/लीच पीट/मॅजिक पीट किंवा सार्वजनिक सांडपाणी व्यवस्थापनाची सुविधा (WSP/DEWATS/Phytorid) constructed wetland/Duckweed/Pond इत्यादि) उपलब्ध आहे.

३. गावामध्ये आवश्यकतेनुसार गटाराची सुविधा उपलब्ध आहे.

४. जर गावात वरील बाबीं व्यतिरिक्त अन्य बाबींच्या माध्यमातून सांडपाण्याचे व्यवस्थापन केले असेल तर गावाने खालील प्रमाणपत्र SBM-MIS वर PM ०५ मधून upload करावे.

प्रमाणपत्राचा नमूना (सांडपाणी व्यवस्थापन)

मी_________________सरपंच/उपसरपंच/प्रधान____________ ग्राम पंचायत___________तालूका_________जिल्हा_____________राज्य आणि मी ____________ ग्राम सेवक प्रमाणित करतो/करते की, आमच्या गावात (गावाचे नाव) वैयक्तिक/सार्वजनिक स्तरावर योग्य मार्गाने सांडपाण्याचे व्यवस्थापन आणि त्यावर प्रक्रिया करण्यासाठी पुरेशी व्यवस्था कार्यान्वित आहे. सदर ठराव हा दिनांक _________च्या ग्राम सभेमध्ये घेण्यात आला आहे.

iv) **गावाची दृष्यमान स्वच्छता-**

- गावातील सर्व सार्वजनिक ठिकाणी तथा ८० टक्के कुटुंबांकडे कमीत कमी कचरा निर्मिती व कमीत कमी साचलेले पाणी (stagenent water) आढळणे तसेच प्लॅस्टिक कचरा ढिगाऱ्यांची निर्मिती नसणे यावरून सदर गावातील दृष्यमान स्वच्छता निश्चित करावी.

वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावरील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पूर्ण झालेली सार्वजनिक शौचालये, शाळा व अंगणवाडी स्वच्छता/शौचालय इ. चे Geo-tagging केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या SBM-Phase II च्या मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून करावे.

**ब) <u>गावे हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) जाहीर करण्याची कार्यपद्धती:-</u>**

i) **गावे /जिल्हा हागणदारीमुक्त अधिक** (ODF Plus) घोषित करण्याबाबत वाचा क्र.९ येथील पत्रान्वये केंद्र शासनाने **खालील प्रमाणे** तीन टप्पे विहित केले आहेत:-

| | |
|---|---|
| हागणदारीमुक्त अधिक (उदियमान)/Aspiring | १). गावात सर्व कुटुंबांकडे कार्यरत शौचालय सुविधा असून त्याचा वापर आहे. |
| | २). गावात सर्व शाळा, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय येथे कार्यरत शौचालय सुविधा असून शौचालयात महिला व पुरुषांसाठी शौचालयाची स्वतंत्र सुविधा आहे |
| | ३). गावात सांडपाणी व्यवस्थापन किंवा घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत विविध सुविधा उपलब्ध आहे. |
| हागणदारीमुक्त अधिक (उज्वल)/Rising | १) गावात सर्व कुटुंबांकडे कार्यरत शौचालय सुविधा असून त्याचा वापर आहे. |
| | २) गावात सर्व शाळा, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय येथे कार्यरत शौचालय सुविधा असून शौचालयात महिला व पुरुषांसाठी शौचालयाची स्वतंत्र सुविधा आहे. |
| | ३) गावात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत विविध सुविधा आहे. |
| | ४) गावात सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत विविध सुविधा आहे. |
| हागणदारीमुक्त अधिक (उत्कृष्ट)/Model | १) गावात सर्व कुटुंबांकडे कार्यरत शौचालय सुविधा असून त्याचा वापर आहे. |
| | २) गावात सर्व शाळा, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय येथे कार्यरत शौचालय सुविधा असून शौचालयात महिला व पुरुषांसाठी शौचालयाची स्वतंत्र शौचालय सुविधा आहे. |
| | ३) गावात सर्व सार्वजनिक ठिकाणी किमान कचरा, कमीत कमी सांडपाणी असून साचलेला प्लास्टीक कचरा आढळत नाही. |
| | ४) गावात सांडपाणी व्यवस्थापनाची सुविधा आहे. |
| | ५) गावात घनकचरा व्यवस्थापनाची सुविधा आहे. |
| | ६) गावात हागणदारीमुक्त अधिकचे दृष्यमान संदेश वॉल पेंटिंगच्या माध्यमातून लावण्यात आले आहेत. |

ii) उपरोक्त **"अ"** मध्ये नमूद निकषांची पूर्तता करणारे गाव वरील तीन टप्प्यांतर्गत हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) मानांकन प्राप्त करण्यासाठी पात्र असल्याबाबत स्वयंघोषणा करण्यासाठी, संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा/मासिक सभेचा त्याप्रमाणे ठराव असणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीने हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus ) म्हणून स्वंयघोषित केल्यानंतर सदर घोषणा , मोबाइल युजरने SBM phase II मोबाइल App वर सोबतचे **"प्रपत्र-ब"** अपलोड करावे.

क) **<u>हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) घोषित केलेल्या गावांची पडताळणी प्रक्रिया:-</u>**

गावाची हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) उत्कृष्ट/Model घोषणा, SBM-Phase II च्या मोबाईल ॲप्लिकेशनवर केल्यानंतर, सदर गावाची संपूर्ण पडताळणी, गाव हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) उत्कृष्ट/Model म्हणून घोषित केल्यानंतरच्या ९० दिवसापर्यन्त जिल्हा व तालूका स्तरावरून निश्चित करण्यात आलेल्या त्र्ययस्थ संस्थेमार्फत करावी. तथापि पडताळणीवेळी त्रयस्थ संस्था अस्तित्त्वात नसल्यास, खालील **"ड"** येथे नमूद केलेल्या समितीमार्फत गावाची संपूर्ण पडताळणी करावी. पडताळणी समितीने एका गावाची जास्तीत जास्त २ दिवसात पडताळणी पूर्ण करावी.

गावांच्या पडताळणी दरम्यान वरील समितीला काही त्रुटी आढळल्यास समितीने तसे अभिप्राय द्यावेत. सदर त्रुटींची पुर्तता संबधित गावाने १ महिन्याच्या आत करावी. संबधित गावाने त्रुटीची पुर्तता केल्यानंतर, सदर त्रुटींची पडताळणी, खालील **"ड"** येथे नमूद केलेल्या समितीमार्फत पुन्हा करून गावाने हागणदारी मुक्त अधिक (ODF Plus) च्या निकषांची पूर्तता केली असल्यास, सदर गावे हागणदारी मुक्त अधिक (ODF Plus) असल्याची माहिती, गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांना कळवावी वाचा क्र.९ येथील पत्रान्वये केंद्र शासनाने हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) गावे IMIS वर नोंद घेऊन घोषित करण्यासाठी मोडयूल उपलब्ध करुन दिले आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांनी सदर मोडयूल नुसार गावांची माहिती नोंदीत करावी.

ड ) **<u>हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus ) पडताळणी समितीची रचना:-</u>**

i) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा/तालुका/ग्रामस्तरीय अधिकारी व कर्मचारी यांची अथवा अशासकीय सदस्यांची समिती गठित करावी. सदर समितीमध्ये चार सदस्यांचा समावेश असावा. समिती सदस्यांमध्ये जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरील अधिकारी / कर्मचारी / सरपंच / ग्रामपंचायत सदस्य / स्वच्छाग्रही / अंगणवाडी सेविका / आरोग्य कर्मचारी / महिला बचत गट / अशासकीय सदस्य तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सूचित केलेले अन्य सदस्य असावेत. सदस्य अंतर्भूत करण्याचे अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहतील.

ii) गावाची हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) पडताळणी सुकर होण्याकरिता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी ज्या गावाची पडताळणी करावयाची आहे, त्या गावाच्या पडताळणी समितीमध्ये, उपरोक्त ड) i) येथे नमूद केलेल्या सदस्यांपैकी जिल्हा, तालुका स्तरावरील अधिकारी वगळता, अन्य सदस्य हे लगतच्या ग्रामपंचायती क्षेत्रामधील असावेत. ज्या गावाची पडताळणी करावयाची आहे, ते गाव, ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये येते, त्या ग्रामपंचायतीशी संबधित कोणत्याही शासकीय/ अशासकीय सदस्याचा, समावेश उपरोक्त ड) i) येथील पडताळणी समितीमध्ये होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

iii) पडताळणी समितीस कोणत्याही प्रकारचे मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

iv) सदर समितीतील/संस्थेतील सदस्यांना हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) पडताळणी बाबत सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी सदस्यांना जिल्हा/ तालुका स्तरावरून प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षणाचा खर्च IEC घटका अंतर्गत मर्यादेत निधीतून करावा.

v) सदर समितीने /संस्थेने पडताळणी केल्यानंतर पडताळणीचा अहवाल स्वाक्षांकींत करुन संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे सादर करावा. संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यानी सदरचा अहवाल जिल्हा स्तरावर सादर करावा.

vi) सदर प्रक्रियेचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षावर निश्चित करण्यात यावी.

vii) प्रत्येक गावाची हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) पडताळणी करताना, सोबतच्या **"प्रपत्र अ"** तसेच त्यासोबतच्या "प्रपत्रे ड ते ऐ" या नमुन्यानुसार पडताळणी करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२११०२९१४५२५८७४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=11ac200219edb36f7777ee110165?b[illegible]4271090267228122b638d6f2cdedad62,
pseudonym=268C7E15F99BF8B492638E14751A661EBCF0233F
serialNumber=2314CF333F070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2021.10.29 15:28:09 +05'30'

(चं. कृ. मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.
९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी
१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.सहसचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद सर्व.
१४.उपायुक्त (विकास), सर्व.
१५.उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.
१६.उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग सर्व
१७.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
१८. संगणक कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.
१९.कार्यासन (पापु-१६),पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. (निवडनस्ती)

## प्रपत्र अ

### गाव हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)जाहीर करण्याची/पडताळणी सूची

| क्र. | मुद्दे | शेरा |
|---|---|---|
| १ | गावातील प्रत्येक कुटुंबाला कार्यरत शौचालयाची सुविधा उपलब्ध असून, त्याचा वापर करतात (वैयक्तिक/ सामुदायिक/ सार्वजनिक) | होय/नाही |
| २. | किमान एक वापरात असलेले सार्वजनिक शौचालय गावात आहे, ज्यामध्ये महिला व पुरुषांकरिता स्वतंत्र शौचालय सुविधा आहे/नाही. | होय/नाही |
| ३. | सर्व शाळा/अंगणवाडी/ग्रामपंचायत कार्यालयांच्या ठिकाणी कार्यरत शौचालयाची सुविधा आहे आणि मुला मुलींसाठी /महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र व्यवस्था आहे. (अंगणवाडी मध्ये शौचालय सुविधा नसल्यास अंगणवाडी शेजारील सार्वजनिक शौचालय / शाळेचे शौचालय/अन्य सुविधा उपलब्ध आहे /नाही.) | होय/नाही |
| ४ | सर्व सार्वजनिक ठिकाणी<br>१. कमीत कमी कचरा निर्मिती<br>२. कमीत कमी साचलेले पाणी<br>३. प्लॅस्टिक कच-याचे ढीग न आढळणे | होय/नाही |
| ५ | सर्व प्राथमिक शाळा, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय व गावातील किमान ८० टक्के कुटुंबांकडे विघटनशील कच-याचे व्यवस्थापन खालील माध्यमातून केले आहे.<br>१. सार्वजनिक/वैयक्तिक कंपोस्ट पीट<br>२. सार्वजनिक/वैयक्तिक बायोगॅस<br>३. अन्य व्यवस्था | होय/नाही |
| ६ | सर्व प्राथमिक शाळा, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय व गावातील किमान ८० टक्के कुटुंबांकडे सांडपाणी व्यवस्थापन खालील माध्यमातून करण्यात आले आहे.<br>१. सार्वजनिक शोषखड्डे २. वैयक्तिक शोषखड्डे<br>३. स्थिरीकरण तळे ४. अन्य सुविधा | होय/नाही |
| ७ | गावात प्लॅस्टिक कचरा वर्गीकरण,संकलन व साठवण सुविधा आहे. | होय/नाही |
| ८ | खालील विषयांच्या बाबतीतील माहिती, शिक्षण व संवादाचे ( IEC) किमान ५ संदेश गावात दृष्यांकीत केले आहेत.<br>१. ODF शाश्वतता व शौचालयांचा नियमित वापर<br>२. हात धुण्यासाठी साबणाचा वापर<br>३. विघटनशील कच-याद्वारे खत निर्मिती<br>४. प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन<br>५. शोष खड्डयाच्या माध्यमातून सांडपाणी व्यवस्थापन | होय/नाही |

हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) म्हणून घोषित गावांची १००% पडताळणी, शासन निर्णयातील **"ड"** मध्ये नमूद केलेल्या समितीमार्फत तसेच या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्राप्रमाणे करण्यात यावी. तसेच हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) म्हणून घोषित गावांची यादृच्छिक ( Random Sampling ) पद्धतीने निवड करून, या गावातील ५% कुटुंबांची, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई यांनी तपासणी करावी.

# प्रपत्र ब- गावासाठी

## Self ODF Plus Declaration Format

(Format as per SBM (G) Phase II Guideline Annexure-XI)

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

I, Shri/Shrimati----------------------------------Sarpanch/ Upsarpanch /Pradhan /Mukhiya of ---------------------Gram Panchayat,-------- Block---------------District,----------------State, and I,Shri /Shrimati --------------the Gram Panchayat Secretary, hereby certify that our Gram Panchayat/Village is now ODF-Plus (Open Defecation Free with solid and liquid waste management). This resolution was adopted during the Gram Sabha/Monthly Gram Panchayat meeting held on date --------------

| | |
|---|---|
| Signature of | Signature of |
| Sarpanch/Upsarpanch/Pradhan/Mukhiya | Panchayat Secretary |
| Name------------ | Name-------------- |
| Date ----------- | Date ------------ |
| Official Seal | Official Seal |

## प्रपत्र क- जिल्हयासाठी

### ODF plus Declaration Format

(Format as per SBM (G) Phase II Guideline Annexure-XI)

I,Shri/Shrimati ---------------------------------------District collector of ----------------------------District,-------------------State, hereby certify on behalf of citizen and administration of------------------District that our District is ODF Plus (Open Defecation Free with Solid and Liquid waste Management) as on date------------------

Signature

Name--------------

Official Seal----------------

designation------------

## प्रपत्र- ड

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-॥-- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ---------- तालुका-------------ग्राम पंचायत---------

### शौचालय बांधकाम व वापर

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटुंब प्रमुखाचे नाव | कुटुंबातील एकूण सदस्य | शौचालय बांधकाम व सद्यस्थिती | | | पाण्याची सुविधा आहे /नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शौचालय उपलब्ध आहे /नाही | शौचालय नसल्यास शौचास कुठे जातात (उघड्यावर/दुस-याचे शौचालय वापरतात) | शौचालय असल्यास वैयक्तिक/सामूहिक/ सार्वजनिक/सामुदायिक यापैकी कोणते वापरतात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

## प्रपत्र- इ

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-॥-हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ---------- तालुका-------------ग्राम पंचायत---------

### अंगणवाडी पडताळणी

| अ. क्र. | अंगणवाडी नाव | एकूण मुले | शौचालय सुविधा आहे / नाही | असल्यास | | | अंगणवाडी स्वत:च्या मालकीचे शौचालय नसल्यास कोणते वापरतात | नळा द्वारे पाण्याची सुविधा आहे /नाही (नळा द्वारे नसल्यास अन्य कोणत्या मार्गे आहे ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शौचालय वापर आहे/नाही | शौचालयाचा मैला वाहक पाईप उघड्यावर सोडला आहे का ? होय/नाही | स्वच्छता असून वापर आहे/नाही | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

## प्रपत्र- ई

### स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II-- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- --------- तालुका-------------ग्राम पंचायत---------

शाळा पडताळणी

| अ क्र | शाळेचे नाव | एकूण मुले | शौचालय आहे/नाही | असल्यास | | | | शाळेचे स्वतःच्या मालकीचे शौचालय नसल्यास कोणते वापरतात | नळा द्वारे पाण्याचीसुविधा आहे /नाही (नळा द्वारे नसल्यास अन्य कोणत्या मार्गे आहे ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुला मुलींसाठी स्वतंत्र शौचालय सुविधा आहे /नाही | केवळ एक शौचालय आहे, मुता-या आहेत होय/नाही | शौचालयाचा मैला वाहकपाईप उघड्यावर सोडला आहे का? होय/नाही | स्वच्छता असून वापर आहे/नाही | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

## प्रपत्र- उ

### स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II-- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- --------- तालुका-------------ग्राम पंचायत---------

सार्वजनिक शौचालय पडताळणी

| अ.क्र. | सार्वजनिक शौचालयाचे ठिकाण | शौचालय वापरणारी एकूण कुटुंबे | महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालय सीट उपलब्ध आहे/नाही | नळाद्वारे पाण्याची सुविधा आहे/नाही | नळाद्वारे पाणी सुविधा नसल्यास अन्य कोणत्या मार्गे आहे ? | स्वच्छता आहे/नाही | वापर आहे/नाही | देखभाल दुरूस्ती साठी उपाय योजना आहे/नाही | असल्यास कोणामार्फत केली जाते (ग्रा. पं/महिला बचत गट/सहा. संस्था/लाभार्थी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

## प्रपत्र- ऊ

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II--- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ------------ तालुका-------------------ग्राम पंचायत----------

### गावातील सार्वजनिक ठिकाणे /आरोग्य सुविधांच्या ठिकाणी शौचालय सुविधा

| अ.क्र. | सार्वजनिक ठिकाणे | शौचालय सुविधा आहे/नाही | स्वच्छता आहे/नाही | नळाद्वारे पाणी सुविधा आहे/नाही | नळाद्वारे पाणी सुविधा नसल्यास अन्य कोणत्या मार्गे आहे ? | वापर आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

सार्वजनिक ठिकाणे-- ग्रामपंचायत कार्यालय/अन्य शासकीय कार्यालये/संस्थेची कार्यालये/बाजाराची ठिकाणे /मंदिरे यांची नावे लिहावीत आणि प्रपत्राच्या अनुषंगे माहिती नमूद करावी

## प्रपत्र-ए.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II -- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ----------- तालुका--------------ग्राम पंचायत---------

### घनकचरा व्यवस्थापन

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटुंब प्रमुखाचे नाव | सार्वजनिक/वैयक्तिक कंपोस्ट पीटच्या सुविधा आहेत/नाहीत | सार्वजनिक/वैयक्तिक बायोगॅस आहे/नाही | घनकच-याचे व्यवस्थापन केले आहे/नाही | सार्वजनिक/वैयक्तिक कंपोस्ट पीटच्या सुविधा आहेत/नाहीत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

# प्रपत्र-ऐ.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II-- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- --------- तालुका------------ग्राम पंचायत---------

## सांडपाणी व्यवस्थापन

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटुंब प्रमुखाचे नाव | सांडपाण्यासाठी वैयक्तिक शोषखड्डयांच्या सुविधा आहेत | सांडपाण्यासाठी स्थिरीकरण तळ्याची सुविधा आहेत | सांडपाण्याचे व्यवस्थापन कसे केले आहे | सार्वजनिक शोषखड्डेच्या सुविधा आहेत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

## गोषवारा

टिप- सर्व गावाची पडताळणी केल्यानंतर खालील माहिती भरावी.

जिल्हा- ---------तालुका---------ग्राम पंचायत ----------

### १. शौचालय बांधकाम व वापर

| अ.क्र. | एकूण गावे | एकूण कुटुंबे | पाहणी केलेली एकूण कुटुंबे | पैकी शौचालय असणारी एकूण कुटुंबे | उघड्यावर जाणारी एकूण कुटुंबे | किती कुटुंबांकडे नळा द्वारे पाणी सुविधा नाही | समितीचा अभिप्राय (गाव हागणदारी मुक्त अधिक आहे/नाही) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

### २. अंगणवाडी व शाळा पडताळणी

| अ. क्र. | एकूण प्राथमिक/ पूर्ण प्राथमिक (म्हणजे काय) शाळा | पैकी किती शाळांकडे मुलांसाठी आणि मुलींसाठी शौचालय आणि मुता-यांची सुविधा आहे. | किती शाळांकडे मुलांसाठी आणि मुलींसाठी शौचालय आणि मुता-यांची स्वतंत्र सुविधा नाही | किती शाळांकडे एक शौचालय आणि पुरेशा मुता-या आहेत | किती शाळांकडे नळाद्वारे पाणी सुविधा नाही | एकूण अंगणवाडी | पैकी किती अंगणवाडीकडे शौचालय सुविधा आहे | पैकी किती अंगणवाडी मध्ये शौचालय सुविधा नाही | किती अंगणवाडीकडे नळाद्वारे पाणी सुविधा नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

## ३. सार्वजनिक शौचालय पडताळणी

| अ.क्र. | एकूण सार्वजनिक शौचालये | पैकी वापरत असलेली सार्वजनिक शौचालये | नळाद्वारे पाणी सुविधा असणारी सार्वजनिक शौचालये | देखभाल दुरुस्ती साठी उपाय योजना असणारी सार्वजनिक शौचालये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

## ४. घनकचरा व्यवस्थापन

| अ.क्र. | एकूण कुटुंबे | पैकी किती कुटुंबांकडे सार्वजनिक पीटच्या सुविधा आहेत | पैकी किती कुटुंबांकडे वैयक्तिक कंपोस्ट पीटच्या सुविधा आहेत | किती कुटुंबांकडे वैयक्तिक बायोगॅस आहेत | किती कुटुंबांकडे घनकच-याचे व्यवस्थापन केलेले नाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

## ५. सांडपाणी व्यवस्थापन

| अ.क्र. | एकूण कुटुंबे | पैकी किती कुटुंबांकडे सार्वजनिक शोषखड्ड्याच्या सुविधा आहेत | किती कुटुंबांकडे वैयक्तिक शोषखड्डेसुविधा आहेत | किती कुटुंबांच्या सांडपाण्यासाठी स्थिरीकरण तळ्याची सुविधा आहे | किती कुटुंबांकडे अन्य मार्गाने सांडपाण्याचे व्यवस्थापन केले आहे | किती कुटुंबांकडे सांडपाण्याचे व्यवस्थापन केले नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

६. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन वर्गीकरण व एकत्रिकरण

| प्लॅस्टिक कचरा वर्गीकरण सुविधा आहे/नाही | असल्यास प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन वर्गीकरण सुविधा असलेले ठिकाण | प्लॅस्टिक कचरा एकत्रिकरण सुविधा आहे/नाही | असल्यास प्लॅस्टिक कचरा एकत्रिकरण सुविधा असलेले ठिकाण | वर्गीकरण व एकत्रिकरण नसल्यास कारण नमूद करावे | वर्गीकरण व एकत्रिकरण नसल्यास प्लॅस्टिक व्यवस्थापन कसे केले जाते | ग्राम पंचायतीमध्ये घंटा गाडी आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

७. हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) माहिती, शिक्षण व संवाद (IEC) संदेश

| अ.क्र. | हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) माहिती, शिक्षण व संवाद (IEC) संदेश (ODF S/SLWM/Key Hygine Practice) निदर्शनास आले/नाही | असल्यास ठिकाण कोणते | असल्यास कोणत्या विषयाचे IEC संदेश निदर्शनास आले |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

| समितीचा अभिप्राय- |
|---|
| सपूर्ण ग्रामपंचायत हागणदारी मुक्त अधिक आहे. |
| सर्व कुटुंबे शौचालयाचा वापर करतात. |
| गावात कुठेही उघड्यावर मानवी विष्ठा आढळून आली नाही. |
| गावात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाच्या पुरेशा उपाय योजना आहेत. |
| हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) अनुषंगाने माहिती, शिक्षण व संवाद (IEC) चे ५ प्रकारचे संदेश निदर्शनास आले आहेत. |

समिती अध्यक्षाचे नाव व स्वाक्षरी

समिति सदस्यांची नावे व स्वाक्षरी